प्रेसनोट दि. १२.०६.२०२०

**सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेतील, कर विभाग कार्यालय कुपवाड येथील दोन कनिष्ठ लिपीक श्री. राजरतन लक्ष्मण चव्हाण, वय ४५ वर्ष, रा.वरची गल्ली, तासगांव, जि.सांगली व श्री शशिकांत शिवराम गायकवाड, वय ४२ वर्षे, पद-कनिष्ठ लिपीक, कर विभाग, कुपवाड यांना ४०,०००/- रूपये लाच स्विकारले नंतर रंगेहात पकडले. सांगली लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.**

---

तक्रारदार यांची कुपवाड गांवामध्ये वडीलार्जीत साडेपाच गुंठयाच्या मोकळया प्लॉटमधील जागेमध्ये सात पत्र्याचे खोकी भाडेकरुनां भाडयाने दिलेले होते. सदर सात पत्र्याच्या खोल्याचे थकीत असलेली घरपट्टी कमी करुन देण्यासाठी सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेतील, कर विभाग कार्यालय कुपवाड येथील श्री चव्हाण क्लार्क व गायकवाड क्लार्क यांनी तक्रारदार यांचेकडे ४०,०००/- रूपये लाचेची मागणी केली असलेबाबतची तक्रार दि.४.६.२०२० रोजी अँन्टी करप्शन ब्युरो, सांगली कार्यालयात तक्रारदार यांनी दिलेली होती.

तक्रारदार यांनी दिले तक्रारीनुसार दिनांक ११.०६.२०२० रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे केले पडताळणी कारवाईमध्ये श्री. राजरतन लक्ष्मण चव्हाण, व श्री शशिकांत शिवराम गायकवाड, पद-कनिष्ठ लिपीक, कर विभाग, कुपवाड यांनी तक्रारदार यांचेकडे ४०,०००/- रूपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले आहे.

त्यानंतर आज दि.१२.०६.२०२० रोजी तक्रारदार यांचे कोंडके मळा,कवलापूर रोड, कुपवाड येथे सापळा लावला असता श्री. राजरतन लक्ष्मण चव्हाण, वय ४५ वर्ष, कनिष्ठ लिपीक, कर विभाग,कुपवाड वर्ग-३ यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून तक्रारदार यांचेकडून ४०,०००/- रूपये लाच रक्कम स्विकारले असताना त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. तसेच श्री शशिकांत गायकवाड, कनिष्ठ लिपीक, कर विभाग, कुपवाड हे पडताळणी कारवाईमध्ये लाच मागीतल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे.

त्याअनुषंगाने श्री राजरतन लक्ष्मण चव्हाण, वर्ग -३ व श्री शशिकांत शिवराम गायकवाड, वय ४२ वर्षे, पद कनिष्ठ लिपीक, कर विभाग, कुपवाड यांचे विरुध्द कुपवाड एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे सो, पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, व श्रीमती सुषमा चव्हाण सो अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री. गुरूदत्त मोरे, व श्री. प्रशांत चौगुले पोलीस निरीक्षक तसेच पोलीस कर्मचारी, अविनाश सागर, संजय संकपाळ, संजय कलकुटगी, रविंद्र धुमाळ,भास्कर भोरे, धनंजय खाडे, सलीम मकानदार, प्रितम चौगुले, सोहेल मुल्ला, राधिका माने, सिमा माने, चालक बाळासाहेब पवार यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स ॲप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल ॲप - www.acbmaharashtra.net
२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB
३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in